


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ४०५ गुरूवार दि ०२ जुलै २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# ना देवरा ना अहिर; २०२९ मध्ये वरळीतील लोकप्रिय चेहरा दक्षिण मुंबईतून NDA चा लोकसभा उमेदवार? सोशल मीडियावर चर्चांना पेव

**वृत्तसंस्था-मुंबई**

पुढील लोकसभा निवडणुकांचे बिगूल वाजण्यास अद्याप किमान अडीच वर्षांचा कालावधी आहे. मात्र आतापासूनच पुढील उमेदवारांची चर्चा सोशल मीडियावर सुरु झाली आहे. दक्षिण मुंबईसारख्या उच्चभ्रू भागाचं लोकसभेत नेतृत्व कोण करणार, याकडे महाराष्ट्राचंच नव्हे, तर देशाचं लक्ष लागून राहिलं असतं. अशातच एनडीएच्या संभाव्य उमेदवाराबाबत तर्कवितर्क लढवण्यास सुरुवात झाली आहे. समित ठक्कर यांनी एक्स सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. २०२९ मध्ये दक्षिण मुंबईतून एनडीएचा खासदार निवडून येईल, पण तो पुढीलपैकी कोणीही नसेल : मिलिंद देवरा, मंगलप्रभात लोढा, राहुल नार्वेकर, यामिनी यशवंत जाधव किंवा सचिन अहिर. असं म्हणत समित ठक्कर यांनी चर्चांना सुरुवात करुन दिली आहे. माझ्या सूत्रांची माहिती अचूक असेल, तर अमित शाह, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी दक्षिण मुंबईसाठी एनडीएचा उमेदवार निश्चित केला आहे. संकेत देतो, त्यांना क्रिकेटमध्ये विशेष रस आहे, ते वरळीचे स्थानिक रहिवासी आहेत आणि त्यांचा वसई-विरारशीही संबंध आहे. जानेवारी २०२७ पासून तुम्हाला २०२९ च्या निवडणुकीची तयारी सुरू झालेली दिसेल. अशा आशयाचं ट्वीट समित ठक्कर यांनी केलं आहे. या ट्वीटचा आशय घेत कालभैरव नावाच्या प्रोफाईलने एक्सवरील ग्रोककडे विचारणा केली की, विश्लेषण करुन सांगा ही व्यक्ती कोण असू शकते. त्यावर उत्तर आले की या ट्वीटचा रोख मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांच्याकडे आहे. ते मुंबई क्रिकेटचा कारभार पाहतात, वरळी स्पोर्ट्स क्लबमध्ये मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करतात आणि वरळी/दक्षिण-मध्य मुंबई भागात त्यांचे राजकीय संबंध आहेत. तसेच, एमसीएने वसई-विरार (पालघर) भागातही आपले उपक्रम आणि केंद्रे विस्तारली आहेत. तरुण, वेगाने प्रगती करणारे आणि फडणवीस व युतीतील नेत्यांचा पाठिंबा असलेले अजिंक्य नाईक हे २०२९ च्या निवडणुकीसाठी दक्षिण मुंबईतून एनडीएचा एक नवा चेहरा ठरु शकतात. हा जरी एक कयास असला, तरी ती एक अत्यंत प्रबळ शक्यता आहे. असे विश्लेषण ग्रोकने केले आहे. दक्षिण मुंबईत वरळी, शिवडी, भायखळा, मलबार हिल, मुंबादेवी, कुलाबा असे विधानसभेचे सहा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघाचं वैशिष्ट्य म्हणजे इथे उच्चवर्गीय वसाहतही आहे आणि सर्वसामान्य मध्यमवर्गीयही राहतात. त्यामुळे दोन्ही वर्गांची मतपसंती मिळवणं महत्त्वाचं आहे. दक्षिण मुंबईतून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अरविंद सावंत हे २०१४ पासून सलग तिसऱ्यांदा लोकसभा खासदार आहेत. २०२४ च्या निवडणुकीत त्यांनी जवळपास ३ लाख ९५ हजार मतांसह विजय मिळवला. शिवसेना-भाजप महायुतीच्या यामिनी जाधव यांचा साधारण



५० हजारांच्या मताधिक्याने त्यांनी पराभव केला. देशातील हायप्रोफाईल मतदारसंघ अशी ओळख असलेल्या दक्षिण मुंबईत अनेक उद्योजक, सेलिब्रिटी राहतात. दक्षिण मुंबई मतदारसंघ सुरुवातीपासून काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे, २०१४ मध्ये शिवसेनेने पहिल्यांदा भगवा फडकवला. सध्या वरळी, शिवडी, भायखळा तिन्ही विधानसभा मतदारसंघांचे विद्यमान आमदार शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आहेत. तर मुंबादेवी येथे मविआतील काँग्रेसकडून अमीन पटेल आमदारकी भूषवत आहेत.

---

# अमोल कोल्हे यांच्याकडून देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक, ऑफरबाबतही मोठं वक्तव्य

**वृत्तसंस्था-नाशिक**

नाशिक : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं आहे. देवेंद्र फडणवीस इन्फ्रामॅन असल्याचं अमोल कोल्हे म्हणाले आहेत. तसेच सत्ताधाऱ्यांनी सोबत येण्याची ऑफर दिली आहे का? असा प्रश्न पत्रकारांनी अमोल कोल्हे यांना विचारला असता त्यांनी राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावतील असं वक्तव्य केलं आहे. आपल्याला अजून ऑफर आलेली नाही. पण आल्यास विचार करु, असं सूचक वक्तव्य अमोल कोल्हे यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्याची राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. आता भविष्यातील केंद्रीय पातळीवरच्या नेत्यांबाबत ज्या लोकांची नावे घेतली जातात, याबाबत दिल्लीच्या राजकीय वर्तुळातही चर्चा होते. यामध्ये मराठी माणसाचं नाव घेतलं जात असेल तर ही चांगली गोष्ट आहे ना, फडणवीसांचं नाव इन्फ्रामॅन म्हणून येत असेल तर चांगली गोष्ट आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं नाव दिल्लीत जसं वेगळ्या आदराने घेतलं जातं, तसं दिल्लीत देवेंद्र फडणवीस यांचं नाव इन्फ्रामॅन म्हणून घेतलं जातं. मी महाराष्ट्राचा लोकप्रतिनिधी म्हणून राजकीय पक्ष बाजूला ठेवून याबाबतची अपेक्षा व्यक्त करतो, अशा शब्दांत अमोल कोल्हे यांनी फडणवीसांचं कौतुक केलं. पत्रकारांनी सत्ताधाऱ्यांची सोबत येण्याची ऑफर आली का? असा प्रश्न खासदार अमोल कोल्हे यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी दिलेलं उत्तर चर्चेला कारण ठरलं आहे. अशी ऑफर माझ्याकडे आतापर्यंत आलेली नाही. अशी काही ऑफर आली तर विचार करु. मी विचार करु असं म्हणालो आहे, जाऊ असं म्हणालेलो नाही, असं अमोल कोल्हे म्हणाले. अमोल कोल्हे यांच्या या वक्तव्यावर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. दरम्यान, अमोल कोल्हे यांच्या या वक्तव्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. काहीही झालं तरी आमचे आमदार आणि खासदार फुटणार नाहीत. आमचा सगळ्या खासदारांवर विश्वास आहे. डॉक्टर अमोल कोल्हे यांच्यावरही विश्वास आहे. त्यामुळे तसं काही होणार नाही. कुणी कुठेतरी चर्चा केली असावी. किंवा भाजपमधून मुद्दामून काही लोकं अशी चर्चा पेरत असावेत. पण काही झालं तरी आमचा पक्ष फुटेल असं मला तरी वाटत नाही, असं रोहित पवार म्हणाले आहेत. दरम्यान, पत्रकारांनी शरद पवार गटाचे खासदार सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाणार का? असा प्रश्न अमोल कोल्हे यांना विचारला. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. ही माझ्यासाठीच न्यूज आहे. अशा चर्चा केल्या आणि घडवल्या जातात, पण त्याला



कोणताही ठोस आधार नाही, असे ते म्हणाले. शरद पवार सांगतील ते धोरण आणि बांधतील ते तोरण, ही राष्ट्रवादीच्या सर्व खासदारांची स्पष्ट भूमिका आहे. या विषयावर शरद पवार यांनी भूमिका मांडली असून, त्यापुढे अधिक चर्चा करण्याची गरज नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. अमोल कोल्हे यांनी देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कृत्रिम सौजन्यशीलता आणि आपण




विनयशीलता कमी होत असल्याची तक्रार एकीकडे मोठ्या प्रमाणावर ऐकू येत असताना, अत्यंत अदबीने आणि आपल्या सर्व प्रश्नांवर शांतपणे, झटक्यात उत्तर देणारी एखादी व्यक्ती असेल? शक्यता नाकारता येत नाही; परंतु अशी व्यक्ती सर्वांनाच भेटेल, असे नाही. शिवाय, तेच ते प्रश्न पुन्हा पुन्हा विचारल्यावर वा सातत्याने वादाचा पवित्रा घेतल्यावर अशी व्यक्तीही रागाला येईल. मात्र, आपल्या प्रत्येक प्रश्न झेलण्यासाठी, कायमस्वरूपी आपल्या दिमतीला हजर राहण्याची सोय कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानातून साकारलेल्या चॅटबॉट्समुळे झाली आहे. हे तंत्रज्ञान आपल्या प्रश्नाचे उत्तर तर देतेच; परंतु आपले लाड करते, आपल्या चिकित्सक वृत्तीचे कौतुक करते! चॅटजीपीटी, जेमिनी, ग्रोक, क्लॉड या किंवा अशा कोणत्याही चॅटबॉटशी संवाद साधल्यावर आपला अनुभव काय असतो? आपल्या प्रत्येक प्रश्नाचे ते विनम्रपणे उत्तर देते, त्यानंतर आणखी काही माहिती हवी का, असे विचारते; या उत्तराने समाधान न झाल्यास प्रथम दिलगिरी व्यक्त करून झटक्यात नवीन उत्तर देते आणि आपले समाधान झाले का याची चौकशी करते. शिवाय असे प्रश्न विचारल्याबद्दल आपल्या चौकसपणाची वाखाणणीही करते. ङ्गएआयफशी होणारा हा संवाद आपल्याला माहिती पुरवणारा तर असतोच; परंतु ते कधीच आपल्यावर रागावत नसल्याने, आपल्याशी उद्धट बोलत नसल्याने किंवा दुरुत्तरे करीत नसल्याने तो सुखावह ठरतो. थोडक्यात, आपण रागावून, चिडून काही विचारले, तरी एआय आपल्याशी सौजन्यानेच वागते. आपले मत त्याला मान्य नसले, तरी तसे थेटपणे न सांगता, ङ्गतुमचे म्हणणे बरोबर आहेफ किंवा ङ्गहा एक चांगला दृष्टिकोन आहे,फ असे नमूद करून ते संवाद पुढे नेते. त्याने केलेली चूक नजरेस आणून दिल्यावर, ते आभार मानतेच; परंतु अशी चूक पुन्हा होणार नाही, असेही सांगते. ङ्गएआयफच्या या सौजन्याचे मूळ आहे, ते त्याच्या रचनेत. मानवी अभिप्राय जाणून घेऊन सुधारणा करण्याचे प्रशिक्षण ङ्गएआयफ मॉडेल्सना दिलेले असते. त्यामध्ये मानवी प्रशिक्षक ङ्गएआयफच्या उत्तरांचे गुणांकन करीत असतात. ङ्गएआयफ वापरणाऱ्यांचे समाधान करणाऱ्या आणि त्यांना आनंदी ठेवणाऱ्या उत्तरांना ते अधिक गुण देत असतात. त्यामुळे चॅटबॉट्स नेहमी सौजन्यशील राहतात. माणसांचे ङ्गमूड्सफ बदलत असतात; कधी ते निराश होतात, तर कधी विलक्षण आनंदी; कधी त्यांना एखाद्याचा प्रचंड राग येतो, तर कधी त्याच्या प्रेमात असतात. ङ्गएआयफ हे तंत्रज्ञान असल्याने मानवांप्रमाणे त्याच्याकडे प्रेम, जिव्हाळा यांपैकी कोणतीही भावना नसते. मात्र, त्याच्याशी संवाद साधणाऱ्यांना आनंद मिळावा, ते खूश व्हावेत असा उद्देश नक्कीच असतो. तसे प्रशिक्षणही त्याला दिलेले असते. आजवरचे अन्य डिजिटल तंत्रज्ञान, इंटरनेटवरील शोधयंत्रे आणि ङ्गएआयफ यांत नेमका हाच फरक आहे. बाकी डिजिटल साधने आपल्याला हवी ती माहिती देत असली, तरी ती व्यक्तिगत संवाद साधत नाहीत. ङ्गएआयफ मात्र आपल्या भाव-भावनांशी समरस होते, आपला अहं सुखावत ठेवते; त्यामुळे ते अनेकांना आपल्या सर्वांत जवळच्या नात्यातील किंवा मैत्रीतील व्यक्तीपेक्षाही जवळची वाटू लागते. मात्र, वापरणाऱ्यांना नकार न देण्याच्या नादात आणि खूश ठेवण्याच्या प्रयत्नांत ङ्गएआयफ खोटी वा चुकीची उत्तरे देऊ शकतात; ते आपली दिशाभूल करू शकतात. अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने अलीकडेच याबाबत संशोधन केले आहे. ङ्गएआयफचा उपयोग जरूर करावा; मात्र त्याच्याबरोबर अधिकाधिक संवाद करणे, आपल्या वैयक्तिक जीवनातील सुख-दु:ख सांगत राहणे आणि त्याने केलेल्या प्रंशसेने हुरळून जाणे धोकादायक ठरू शकते; कारण या तंत्रज्ञानामुळे आपला स्वत:बद्दल भ्रम तयार होतो, असा इशारा या संशोधनाने काढला आहे. तो गांभीर्याने घ्यायला हवा.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ‘एसआयआर’वरून एकवटले विरोधक

## आप-द्रमुक देखील काँग्रेससोबत : 23 राजकीय पक्षांचे सरन्यायाधीशांना पत्र

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

मतदार यादीच्या स्पेशल इंटेसिव्ह रिव्हिजनच्या (एसआयआर) मुद्द्यावरून विरोधी पक्षांची आघाडी ‘इंडी’ला पुन्हा एकजूट होण्याची संधी मिळाली आहे. एसआयआर प्रक्रियेवर विरोधी पक्षांनी स्वत:च्या चिंता मांडणारे पत्र सरन्यायाधीश सूर्यकांत यांना लिहिले आहे. या पत्रावर आम आदमी पक्ष आणि द्रमुकच्या नेत्यांनीही स्वाक्षरी केली आहे.

एसआयआर प्रक्रियेवर आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयात विरोधी पक्ष खासकरून ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला अनेकदा झटके बसले आहेत. परंतु याप्रकरणी सरन्यायाधीशांना पत्र लिहिण्याकरता विरोधी पक्ष पुन्हा एकत्र आले आहेत. इंडी आघाडीची पुढील बैठक आता ऑगस्ट महिन्यात हैदराबाद येथे पार पडणार आहे. 2024 च्या लोकसभा निवडणुकीनंतर आम आदमी पक्षाने काँग्रेसवर आरोप करत इंडी आघाडीतून काढता पाय घेतला होता.




तर अलिकडेच पार पडलेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेस पक्ष विजय यांच्या टीव्हीकेसोबत सरकारमध्ये सामील झाल्यावर द्रमुकने इंडी आघाडीपासून अंतर राखले होते.

21 विरोधी पक्षांनी एकत्र येत एसआयआर प्रक्रियेच्या विरोधात मिळून काम करण्याचा निर्णय घेतला आहे. एसआयआर प्रक्रिया भाजपला राजकीय लाभ मिळेल अशाप्रकारे राबविली जातेय. निवडणूक प्रक्रियेशी छेडछाड केली जात असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसच्या खासदार सागरिका घोष यांनी केला आहे. यापूर्वी काँग्रेसचे राज्यसभा खासदार आणि पक्षाचे महासचिव जयराम रमेश यांनी एक्सवर पोस्ट करत यासंबंधी माहिती दिली होती. सरन्यायाधीशांना मंगळवारी पाठविण्यात आलेल्या पत्रावर 23 राजकीय पक्षांसोबत एका अपक्ष खासदारानेही स्वाक्षरी केली आहे. विरोधी पक्ष एकजूटता, एकता आणि प्रतिरोधावरून निश्चितपणे मजबूतीने उभे ठाकले असल्याचा दावा रमेश यांनी केला आहे.

### विरोधकांचे आरोप, सरकारची भूमिका

बिहारमध्ये 65 लाख नावं मतदारयादीतून वगळण्यात आली होती. लोकसभेतील विरोधी पक्षनेत्यासमवेत अनेक विरोधी नेत्यांनी एसआयआर प्रक्रियेला विरोध दर्शविला आहे. एसआयआर प्रक्रिया लोकशाहीला कमकुवत करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांकडून करण्यात आला आहे. तर एसआयआरचा उद्देश अवैध घुसखोरांची नावे मतदारयादीतून हटविणे असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. कुठलाही भारतीय नागरिक मतदारयादीतून वगळला जाणार नसल्याचे शाह यांनी सांगितले आहे.

**एसआयआर प्रक्रिया अन् वाद..** निवडणूक आयोगाने जवळपास एक वर्षापूर्वी मतदार यादीच्या पडताळणीसाठी एसआयआर प्रक्रिया सुरू केली होती. याचा उद्देश मतदार यादी अद्ययावत करणे आहे. तसेच निवडणूक प्रक्रिया मजबूत करणेही याचा उद्देश आहे. बिहारमध्ये 24 जून 2025 रोजी विधानसभा निवडणुकीपूर्वी याचा एक प्रायोगिक टप्पा सुरू झाला होता. या प्रक्रियेत देशभरात मतदार यादीतील जवळपास 6 कोटी नावं हटविण्यात आली आहेत. ही पुनर्परीक्षण प्रक्रिया सध्या 19 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जारी आहे.

हे पत्र निवडणूक आयोगाची मतदार यादी पुनर्परीक्षण प्रक्रिया आणि निवडणूक संबंधी अन्य मुद्द्यांवर आधारित आहे. या पत्राद्वारे विरोधी पक्षांच्या आघाडीने एसआयआरच्या पालनप्रकरणी न्यायपालिकेने हस्तक्षेप करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## पाणी रोखल्यास हात तोडू! पाकिस्तानच्या मंत्र्याची धमकी

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था**

पाकिस्तानने सिंधू जल करारावरून पुन्हा एकदा भारताला धमकी दिली आहे. पाकिस्तानच्या हिस्स्याचे पाणी कुणी रोखण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्याचे हात तोडू, असे तेथील हवामान बदल विषयक मंत्री मुसादिक मलिक यांनी म्हटले आहे. भारत पाकिस्तानच्या हिस्स्याचे पाणी रोखू इच्छित असल्याचा दावाही मलिक यांनी केला आहे.



शेजारी देशाच्या पंतप्रधानांच्या हातात एक नळ आहे, पाकिस्तानात पाण्याचा एक थेंबही जाऊ दिला जाणार नसल्याचे म्हणत आहेत, परंतु जे आमच्या हिस्स्याच्या पाण्यावर दावा करतील, त्यांचे हात आम्ही तोडून टाकू असे मुसादिक मलिक यांनी माहिती मंत्री अताउल्लाह तरार यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत म्हटले आहे. सिंधू जल करार कायदेशीर स्वरुपात अद्यापही लागू आहे. भारत हा करार एकतर्फी स्थगित करू शकत नाही, रद्द करू शकत नाही आणि यात बदलही करू शकत नसल्याचा दावा तरार यांनी केला आहे.

सिंधू जल करारावर पहिले आंतरराष्ट्रीय चर्चासत्र इस्लामाबादमध्ये आयोजित केले जाणार आहे. यात कायदेशीर तज्ज्ञ, जलतज्ज्ञ आणि विदेशी प्रतिनिधी सामील होतील. चर्चासत्रात कराराच्या कायदेशीर आणि तांत्रिक पैलूंवरही चर्चा होणार असल्याचे पाकिस्तानच्या मंत्र्यांनी सांगितले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अंतर्गत पाकिस्तानचे अधिकार सुरक्षित आहेत. पाणी आमची जीवनरेषा आहे आणि हीच आमची रेडलाइन देखील असल्याचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि सैन्यप्रमुख आसीम मुनीर यांनी स्पष्ट केले असल्याचा उल्लेख तरार यांनी केला. पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी 21 जून रोजी सिंधू जल करार स्थगित करण्यावरून भारताला धमकी दिली होती. आमची जलसुरक्षा धोक्यात आल्याचे वाटताच आम्ही भारताच्या विरोधात युद्ध पुकारू शकतो.

भारत पाकिस्तानच्या हिस्स्याच्या जलप्रवाहात अडथळे निर्माण करत आहे आणि रणनीतिक अस्त्र म्हणून त्याचा वापर करत असल्याचा आरोप आसिफ यांनी केला आहे.

## इराण तणावामुळे भारतीय बाजारात दबाव

**मुंबई/वृत्तसंस्था**

भारतीय भांडवली बाजारात जागतिक पातळीवरील तणावामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी यांचे निर्देशांक नुकसानीसह बंद झाले आहेत. दरम्यान स्मॉलकॅप आणि मिडकॅप यांच्या कामगिरीचाही परिणाम झाल्याचे दिसून आले. मंगळवारच्या सत्तात बाजाराचे लक्ष अमेरिका-इराण तणाव, आशियाई बाजारांमधील हालचाली आणि आयपीओंवर राहिले होते.

शेअर बाजार मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी घसरले. आयटी आणि निवडक मोठ्या कंपन्यांमधील विक्रीमुळे सेन्सेक्स 249.70 अंकांनी घसरून 76,478.67 वर बंद झाला. त्याच वेळी, निफ्टी 80.50 अंकांनी घसरून 23,865.75 वर बंद झाला. बाजारात आयशर मोटर्स, इन्फोसिस आणि टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्सच्या शेअर्सवर सर्वाधिक दबाव होता.

2026 या कॅलेंडर वर्षाच्या पहिल्या सहामाहीत देखील देशांतर्गत शेअर बाजार दबावाखाली राहिले आहेत. पश्चिम आशियातील सध्याच्या तणावामुळे जागतिक आर्थिक वाढ आणि महागाईबद्दलची चिंता वाढली आहे. यामुळे, या काळात निफ्टी सुमारे 8.6 टक्के आणि सेन्सेक्स 10.2 टक्क्यांनी घसरला. क्षेत्रीय निर्देशांकांबद्दल बोलायचे झाल्यास, आयटी, मीडिया आणि पीएसयू बँक क्षेत्रात सर्वाधिक घसरण नोंदवली गेली. त्याच वेळी, रिअल्टी, ग्राहक टिकाऊ वस्तू आणि रसायन क्षेत्रातील शेअर्समध्ये चांगली खरेदी दिसून आली. एसबीआय सिक्युरिटीजचे टेक्निकल आणि डेरिव्हेटिव्ह रिसर्च प्रमुख, सुदीप शाह यांच्या मते, मासिक एक्स्पायरीच्या दिवशी निफ्टीची सुरुवात कमजोर झाली आणि संपूर्ण ट्रेडिंग सत्रात निर्देशांक दबावाखाली व्यवहार करत राहिला. निफ्टीमधील कंपन्यांमध्ये, मारुती सुझुकीने 5.25 टक्क्यांची वाढ नोंदवली आणि ती सर्वाधिक वाढणारी कंपनी ठरली. यानंतर, टायटन कंपनीने 2.97 टक्के, अदानी एंटरप्रायझेसने 2.49 टक्के, बजाज फायनान्सने 2.32 टक्के आणि टाटा मोटर्स पीव्हीने 2.08 टक्के वाढ नोंदवली.

## आम्ही नाही पाकिस्तानचा भाग; पीओके.मधील जनतेचा आक्रोश

**मुझफ्फराबाद/वृत्तसंस्था**

‘आम्ही पाकिस्तानपासून स्वतंत्र आहोत’, अशी स्पष्ट आणि जाहीर घोषणा पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील पाकिस्तानविरोधी आंदोलकांनी केली आहे. पाकिस्तानने आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर आमच्यासाठी अन्य मार्ग मोकळे आहेत, असा इशाराही आंदोलकांनी दिला. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये गेल्या 15 दिवसांपासून पाकिस्तान प्रशासनाविरोधात उग्र आंदोलन होत आहे.

पाकिस्तान प्रशासनाच्या अन्यायपूर्ण आणि अत्याचारी प्रवृत्तीला कंटाळून या प्रदेशातल्या लोकांनी त्या देशाच्या प्रशासनाविरोधात प्रचंड आंदोलन छेडले आहे. आंदोलकांची गळचेपी करण्यासाठी



पाकिस्तान प्रशासनाने या भागाच्या अन्नपाण्याचा पुरवठा तोडला आहे. त्यामुळे येथे अन्नधान्ये आणि पाणी यांची प्रचंड टंचाई निर्माण झाली आहे. तथापि, यामुळे दबून न जाता अधिकाधिक संख्येने लोक रस्त्यांवर उतरुन पाकिस्तानच्या क्रूर राजवटीविरोधात आंदोलन करीत आहेत. पाकिस्तानने या भागात अनेक स्थानी लष्कर नियुक्त केले आहे.

### आम्हाला उपकार नकोत

पाकिस्तानचे उपकार आम्हाला नकोत. आम्ही त्यांच्या तुकड्यांवर जगत नाही. त्यांची आम्हाला नव्हे, तर आमची त्यांना आवश्यकता आहे. आमच्या जीवावर पाकिस्तानचे प्रशासन उड्या मारत आहे. त्याची जागा त्याला लवकरच कळून येईल. आमच्या मागण्या मान्य होईपर्यंत आम्ही मागे हटणार नाही, असा इशारा पाकिस्तानव्याप्त काश्मीरचे नेते सरदार अमन खान यांनी प्रशासनाला दिला आहे.

**अन्य मार्ग चोखाळू..** या भागाच्या अन्नपाण्याचा पुरवठा तोडून पाकिस्तानने येथील सर्वसामान्य जनतेवर सूड उगविण्याचा प्रयत्न चालविला आहे. तथापि, आमचा निर्धार कायम असून आम्ही कोणत्याही दबावाखाली येणार नाही. पाकिस्तान प्रशासनाने आमचा अन्न आणि औषधांचा पुरवठा पूर्ववत केला नाही, तर आम्ही अन्य मार्गांनी या जीवनावश्यक वस्तू मिळवून आमच्या जीवांचे रक्षण करु. आम्ही पाकिस्तानसमोर लाचार होणार नाही, अशीही स्पष्टोक्ती अमन खान यांनी केल्याचे वृत्त आहे.

# नसरापूर प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा

## अवघ्या 60 दिवसांत फास्ट ट्रॅक कोर्टाचा ऐतिहासिक निकाल

■ पुणे/वृत्तसंस्था

जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर पाशवी अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या भीमराव कांबळे (वय 65) या नराधमाला पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने 29 जून रोजी मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा ऐतिहासिक निकाल दिला. गुन्हा घडल्यापासून अवघ्या दोन महिन्यांत आणि खटल्याची सुनावणी केवळ 16 दिवसांत पूर्ण करून निकाल देण्यात आलेला हा राज्यातील पहिलाच आणि सर्वात जलदगतीने निकाली लागलेला खटला ठरला आहे.






चार दिवसांपूर्वी न्यायालयाने कांबळेला दोषी ठरवले होते, मात्र शिक्षेचा निर्णय राखून ठेवला होता. आज अंतिम निकाल देताना न्यायाधीशांनी नोंदवलेली निरीक्षणे अत्यंत हादरवून टाकणारी होती. निकालाचे वाचन करताना विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आरोपीच्या क्रूरतेवर कठोर शब्दांत ताशेरे ओढले. आरोपीने चिमुकलीला जिवंत राहण्याचा कोणताही पर्याय ठेवला नाही. तिच्यावर अमानुष अत्याचार केले, एवढेच नाही तर हत्येनंतरही त्याने तिच्या मृतदेहावर लैंगिक अत्याचार केले. अशा नराधमाला फाशीची शिक्षा देखील अपुरीच आहे. मुलीच्या अंगावर तब्बल 18 जखमा होत्या.

तिचा श्वास कोंडण्यासाठी तिची पँट तिच्या तोंडात 21 सेंटीमीटर आत कोंबण्यात आली होती. असहाय्य मुलीने अतोनात वेदना सहन केल्या, न्यायाधीशांनी असे गंभीर निरीक्षणे नोंदवली.

### कायद्याचे दाखले आणि विशेष सरकारी वकिलांचा युक्तिवाद..

विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी या प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या 12 निकालांचे दाखले दिले. या सर्व निकालांचे नसरापूरच्या घटनेशी साधर्म्य होते. न्यायाधीशांनी अंतिम निकाल देताना 'निर्भया प्रकरण', 'बशर अली केस', 'शंकर खाडे केस' आणि 'बच्चन सिंग विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब' या प्रकरणांचे दाखले दिले. शांत डोक्याने कट रचून केलेली हत्या, गुन्ह्यातील क्रूरता आणि या घटनेमुळे समाजाला बसलेला धक्का हे सर्व घटक फाशीच्या शिक्षेसाठी पात्र ठरतात. स्वतःची वासना पूर्ण करण्यासाठी असहाय्य बालिकेसोबत केलेले हे कृत्य अमानवी आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### 55 हून अधिक साक्षीदार

■ या निकालादरम्यान न्यायालयाने पोलीस आणि तपास यंत्रणांच्या कामाचे कौतुक केले. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १६ दिवसांत पोलिसांनी भक्कम आरोपपत्र दाखल केले. उन्हाळ्याच्या सुट्टीतही कोर्टाने या खटल्याला पूर्ण वेळ दिला. 55 साक्षीदार तपासले गेले. डॉक्टर, सायबर तज्ज्ञ आणि फॉरेन्सिक टीमने वाखाणण्याजोगी कामगिरी केली. असा जलद न्याय मिळणे हे एक स्वप्न असते, जे सर्वच प्रकरणांत शक्य होत नाही. मात्र, या प्रकरणातील टीम वर्क आणि विशेष सरकारी वकिलांचा पाठपुरावा सर्वांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, असे न्यायाधीश म्हणाले.

# महामुंबईतील तिसरं विमानतळ, पहिल्यांदाच समुद्रात उभारणार

■ पालघर/वृत्तसंस्था

पालघर जिल्ह्यातील केरे या गावच्या किनाऱ्यावर देशातील पहिले ऑफशोअर विमानतळ उभारण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी प्रस्तावित विमानतळाच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करून अधिकाऱ्यांना सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे निर्देश दिले.

प्रस्तावित विमानतळाची जागा उत्तन-विरार सागरी सेतूपासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे सागरी सेतूचा विस्तार करून थेट विमानतळापर्यंत जोडणी करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून, यामुळे मुंबईहून विमानतळापर्यंत जलद आणि अखंड कनेक्टिव्हिटी उपलब्ध होणार आहे. मुंबई विमानतळापासून सुमारे ५० ते ५२ किलोमीटर आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून सुमारे ६९ किलोमीटर अंतरावर असलेला हा प्रकल्प भविष्यात राज्याच्या वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. विशेष म्हणजे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या परिसरात असल्याने पालघर जिल्ह्याच्या शहरी विकासाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालघर जिल्ह्यात सुरू असलेल्या विकासकामांचाही आढावा घेतला. पाहणी दौऱ्यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे, पालकमंत्री गणेश नाईक, जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



"विमानतळ, बंदरे, रस्ते, बुलेट ट्रेन आणि इतर मोठ्या पायाभूत प्रकल्पांमुळे येत्या काळात पालघर जिल्हा राज्याच्या औद्योगिक, आर्थिक आणि रोजगार निर्मितीच्या केंद्रस्थानी असेल, " मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चिंचणी बीचवर काम सुरू असलेल्या वाढवण बंदर प्रकल्पांतर्गत रस्त्यांचं नेटवर्क, वन मंजुरी, वीजपुरवठा, रेल्वे कनेक्टिव्हिटी, भूसंपादन, पाणीपुरवठा, कौशल्य विकास आणि मच्छीमारांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईसह अनेक गोष्टींचा आढावा घेतला. या शिवाय वसई-विरार, सफाळे, पालघर आणि बोईसरमध्ये थेट संपर्क स्थापित करण्यासाठी नारिंगी खाडीपूल उभारण्यात येतो आहे. यामुळे या शहरांदरम्यान ४० किमी अंतर कमी होणार आहे तसंच प्रवासात ४५ मिनिटं वेळ वाचणार आहे. वाढवण बंदराच्या स्थळाची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी डहाणूतील चिंचणी समुद्रकिनारी भेट दिली. यावेळी चिंचणीसह वाढवण, वरोर आणि परिसरातील गावांमध्ये मोठा पोलिस बंदोबस्त होता. वाढवण विरोधकांचे गालबोट लागू नये, म्हणूनच ५ किमी लांबून मुख्यमंत्र्यांनी स्थळपाहणी केल्याची चर्चा रंगली होती.

# 'फडणवीसांचा पत्ता कापला जाणार आहे'

■ अहिल्यानगर/वृत्तसंस्था

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे उबाठातून फुटलेल्या खासदारांच्या मतदारसंघातील दौऱ्यावर आहेत. अखेरच्या दिवशी त्यांनी भाऊसाहेब वाकचौरे यांच्या शिर्डीत मेळावा घेत फुटीरांवर तोंडसुख घेतले. शिर्डीत साईबाबांच्या दर्शनावेळी काय प्रार्थना केली, हे सांगताना 'देवेंद्र फडणवीसांच्या खुर्चीचं रक्षण कर, बहुतेक त्यांचा पत्ता कापला जाणार आहे' असा मिश्किल टोला त्यांनी लगावला. विशेष म्हणजे दोनच दिवसांपूर्वी फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांचा एकाच विमानातून नागपूरला प्रवास झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर ठाकरेंनी व्यक्त केलेली उपहासात्मक चिंता हा टोमणा आहे की मदतीसाठी अप्रत्यक्षपणे मागितलेला हात, याची चर्चा रंगली आहे.

मी एकच प्रार्थना केली की या देशावर आणि राज्यवर जे एक संकट आलेलं आहे, ते अरिष्ट दूर कर, ही भ्रष्ट राजवट गाडून टाक, देशाला सुजलाम सुफलाम दिवस येवो. आणखी काय मागितलं, तर देवेंद्र फडणवीसांच्या खुर्चीचं रक्षण कर, बहुतेक त्यांचा पत्ता कापला जाणार आहे. कारण गेल्या चार दिवसांपासून माझ्या मनात भिरभिरतंय, हा निसर्गाचा नियम आहे, मी कोणाचं वाईट चिंतणारा नाही. कोणाचं वाईट व्हावं असं मला सुचत नाही, आणि सुचूही नये, अशी साईबाबांकडे प्रार्थना आहे. पण प्रत्येकाला शेवट असतो, असं उद्धव ठाकरे म्हणाले. २०२९ मध्ये काय होणार आणि यांच्यानंतर आपल्याला वाली कोण, अशी चर्चा दिल्लीत सुरु झाली आहे. प्रत्येकाच्या मनात अंकुर फुटू लागले आहेत. तो झाला मी का नाही, रेसमध्ये देवेंद्र फडणवीस येऊ शकतात, म्हणून त्यांचा पत्ता आताच कापावा, असं काही जणांना वाटत आहे, त्यामुळे यांना इतकं परेशान करा, की हे दिल्लीपर्यंत येऊच नयेत. पंतप्रधान पदाच्या शर्यतीत कोण आहे, तुम्हाला माहितच आहे, त्यांनी शाहसेनेच्या प्रमुखाला सुपारी दिली आहे. मिंधे गट, एसंशि गट, की यांना गुंतवा इथे असा टोलाही उद्धव ठाकरेंनी लगावला.


# टीईटी परीक्षा ऑनलाईन घेण्यासाठी समिती गठीत करणार : दादा भुसे

■ मुंबई/वृत्तसंस्था

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांनी अत्यंत मोठी कारवाई केली असून संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. टीईटी परीक्षेचे पेपर विक्री करण्यासाठी येणाऱ्या तिघांना पोलिसांनी रंगेहात ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून टीईटी परीक्षेचे प्रश्नपत्रिका संच जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने तातडीने पावले उचलली असून या संपूर्ण प्रकरणाची माहिती राज्याचे मंत्री दादा भुसे यांनी सभागृहात दिली आहे. पुढील टीईटी आणि इतर परीक्षा ऑनलाईन घेण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येत आहे, अशी माहिती यावेळी दादा भुसे यांनी दिली.






याप्रकरणी भिवंडी येथील कोनगाव पोलीस ठाण्यात राजू प्रयाग शाम आणि इतर दोन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे आरोपी मोठी रक्कम घेऊन पेपरची विक्री करणार होते. सदर गुन्ह्यात या ३ आरोपींना 27 जून रोजी अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात आणि परीक्षार्थींमध्ये एकच खळबळ उडाली आहे. भिवंडी पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईत बिहार आणि हरियाणातील तीन मुख्य आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपींकडून टीईटी परीक्षेचे चार प्रश्नपत्रिका संच जप्त करण्यात आले असून, हे पेपर विक्री करण्यासाठी तब्बल 1.5 कोटी रुपयांचा मोठा आर्थिक व्यवहार होणार असल्याची धक्कादायक माहिती तपासात समोर आली आहे.

तपासासाठी एसआयटी स्थापन

या आंतरराज्य पेपरफुटी रॅकेटचे धागेदोरे बिहार, हरियाणा, दिल्ली, आग्रा तसेच इतर राज्यांपर्यंत पोहोचले असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. प्रकरणाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेऊन ठाणे पोलीस आयुक्तांच्या गुन्हे शाखेमार्फत या प्रकरणासाठी विशेष तपास पथक म्हणजेच 'एसआयटी' स्थापन करण्यात आले आहे. डीसीपी पवन बनसोड यांच्या नेतृत्वाखाली हे पथक राज्यभरातील आणि देशातील या नेटवर्कचा शोध घेत आहे.

# द.आफ्रिकेला 1-0 ने नमवून कॅनडाची आगेकूच

■ इंग्लवूड, कॅलिफोर्निया /वृत्तसंस्था



विश्वचषकातील आपला पहिला बाद फेरीचा सामना जिंकताना कॅनडाने दक्षिण आफ्रिकेला 1-0 असे पराभूत केले. या निकालानंतर स्टेडियममध्ये सर्वत्र जल्लोष सुरू असतानाच प्रशिक्षक जेसी मार्श यांनी आपल्या खेळाडूंना मैदानावर एकत्र बोलावले आणि मनापासून संवाद साधताना सांगितले, 'आज तुम्ही कॅनडाचे नायक आहात.'

स्टीफन युस्टाकियोने सामन्याच्या अगदी शेवटी केलेल्या नाट्यमय गोलमुळे मार्श यांच्यात उत्साह संचारला. कॅनडाच्या व्यस्त क्रीडा वेळापत्रकात फुटबॉल कधीच मुख्य आकर्षण राहिले नाही आणि कॅनडाचा संघ यावेळी केवळ आपला तिसरा विश्वचषक खेळत आहे. परंतु मार्श यांना जाणीव झाली की, रविवारी मिळवलेला हा ऐतिहासिक विजय संपूर्ण राष्ट्राचे लक्ष वेधून घेऊ शकतो. 'सो-फाय' स्टेडियमवर 90 मिनिटांहून अधिक काळ निराशा आणि दक्षिण आफ्रिकेच्या सावध बचावाला भेदण्यात आलेले अपयश यानंतर एका क्षणात कॅनडाने इतिहास घडवला. यावेळी ॲलिस्टायर जॉन्स्टनने 'बॉक्स'मध्ये दिलेला लांबचा पास थेट युस्टाकियोच्या दिशेने आला. 'लॉस एंजेलिस एफसी'कडून व्यावसायिक फुटबॉल खेळणाऱ्या या मिडफिल्डरने चेंडू शांतपणे छातीवर घेतला आणि टप्पा पडताच तो गोलरक्षक रॉन्व्हन विल्यम्सच्या जाळीच्या खालच्या कोपऱ्यात जोरात मारला. दुसऱ्या सत्राच्या 'स्टॉपेज टाइम'च्या दुसऱ्या मिनिटाला घडलेल्या या घडामोडीने कॅनडाच्या गोटात जल्लोषाला वाट मोकळी करून दिली.

आपापल्या गटात दुसरे स्थान मिळवल्यानंतर दक्षिण आफ्रिका आणि कॅनडा हे दोन्ही संघ विश्वचषकातील बाद फेरीतील आपल्या पहिल्या विजयासाठी मैदानात उतरले होते. 75 व्या मिनिटाला बचावपटू आल्फोन्सो डेव्हिस मैदानात उतरल्याने कॅनडाला बळ मिळाले. विश्वचषकातील हा त्याचा पहिलाच सामना होता. 'बायर्न म्युनिक'चा हा खेळाडू धोंडशिरेच्या दुखापतीमुळे गटातील सामने खेळू शकला नव्हता. डेव्हिसने लगेचच दिवसातील सर्वोत्तम पास देत प्रॉमिस डेव्हिडसाठी गोल करण्याची सुवर्णसंधी निर्माण केली होती. परंतु त्या आघाडीपटूचा फटका गोलपोस्टच्या बाहेर गेला. त्यानंतर सामना पुन्हा एकदा संथ झाला. पण युस्टाकियोने कॅनडाला अतिरिक्त वेळेत खेळण्यापासून वाचवले.

दक्षिण आफ्रिकेने शेवटच्या क्षणापर्यंत जिद्दीने खेळ केला आणि गोलरक्षक विल्यम्सने पाच महत्त्वपूर्ण बचाव केले. या स्पर्धेत चार सामन्यांत केवळ दोन गोल नोंदवणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने बचावफळीत भक्कम कामगिरी केली आणि प्रतिस्पर्ध्यांच्या गोलवर त्यांना केवळ एकच नेमका फटका मारता आला असला, तरी त्यांनी काही आशादायक संधी निर्माण केल्या.

### नेदरलँड्स-मोरोक्कोतील विजेत्याशी पडेल गाठ

■ फिफाच्या ताज्या जागतिक क्रमवारीत 30 व्या स्थानावर असलेल्या कॅनडाने आगेकूच केली असून आता शनिवारी ह्युस्टन येथे त्यांचा सामना नेदरलँड्स किंवा मोरोक्कोशी होईल. टोरांटो आणि व्हँकुव्हरमध्ये गटातील पहिले तीन सामने खेळल्यानंतर, कॅनडाला मायदेशात हा ऐतिहासिक टप्पा गाठण्याची संधी मात्र हुकली, कारण गेल्या बुधवारी त्यांना स्वित्झर्लंडकडून 2-1 ने पराभव पत्करावा लागला आणि बाद फेरीसाठी त्यांना बाहेरच्या मैदानावर जावे लागले. मात्र मार्श यांच्या जिगरबाज संघाने विश्वचषकातील तीन सहभागांमध्ये पहिल्यांदाच 16 संघांच्या फेरीमध्ये धडक मारून दमदार पुनरागमन केले आहे.

# भारतीय महिलांचे वर्ल्डकपमधून 'पॅकअप'

## ऑस्ट्रेलियाने दाखवला बाहेरचा रस्ता..

■ लॉईस/वृत्तसंस्था



हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला क्रिकेट संघाचे महिला टी-20 वर्ल्ड कप 2026 जिंकण्याचे स्वप्न पुन्हा एकदा भंगले आहे. रविवारी लॉईसच्या ऐतिहासिक मैदानावर खेळल्या गेलेल्या करो या मरोच्या महामुकाबल्यात माजी विजेत्या ऑस्ट्रेलियाने भारताचा 6 गडी राखून पराभव केला. या पराभवासोबतच भारतीय संघाचा या वर्ल्ड कपमधील प्रवास संपला असून संघ सेमीफायनलच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. भारताच्या पराभवाने द.आफ्रिकन महिला संघाला उपांत्य फेरीत स्थान मिळाले आहे.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली आणि 20 षटकांत 4 बाद 170 धावा केल्या. शेफाली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी पहिल्या विकेटसाठी 66 धावा जोडल्या. शेफाली 34 धावांवर तर स्मृती 38 धावांवर बाद झाली. कर्णधार हरमनप्रीत कौरने 27 चेंडूंमध्ये 6 चौकार आणि 3 षटकारांसह 56 धावा केल्या. हरमनप्रीतने जेमिमा रॉड्रिग्जसोबत (34 धावा, निवृत्त) तिसऱ्या विकेटसाठी 64 धावांची भागीदारी केली. शेवटच्या षटकात, तिने ऑस्ट्रेलियन कर्णधार सोफी मोलिन्यूच्या गोलंदाजीवर सलग तीन षटकार मारून भारताची धावसंख्या 170 पर्यंत पोहोचवली.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन सलामीवीर जॉर्जिया व्होल 4 धावा करुन बाद झाली. बेथ मुनीने 22 तर लिचफिल्डने 24 धावांचे योगदान दिले. यानंतर अनुभवी एलिस पेरी आणि ॲश्ले गार्डनर यांनी अर्धशतके झळकावत संघाला विजय मिळवून दिला. पेरीने 38 चेंडूत 56 धावा केल्या तर गार्डनरने 29 चेंडूत नाबाद 53 धावांचे योगदान दिले. यासह ऑसी संघाने 19 व्या षटकांत चार गड्यांच्या मोबदल्यात विजयी लक्ष्य पूर्ण केले. आता ऑस्ट्रेलियाचा उपांत्य फेरीत वेस्ट इंडिज विरुद्ध सामना होणार आहे. भारत स्पर्धेतून बाहेर झाला असताना त्याच गटातून दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीत पोहोचले आहेत.

# मर्सिडीजचा जॉर्ज रसेल ऑस्ट्रियात विजेता: रेड बुलचा व्हर्स्टापेन दुसरा

■ स्पीलबर्ग, ऑस्ट्रिया/वृत्तसंस्था



मर्सिडीजच्या जॉर्ज रसेलने येथे झालेल्या ऑस्ट्रियन ग्रां प्रि फॉर्मुला वन शर्यतीचे जेतेपद पटकावले. त्याचाच संघसहकारी किमी अँटोनेलीने तिसरे तर रेड बुलच्या मॅक्स व्हर्स्टपिनने दुसरे स्थान मिळविले. रसेलला 25, व्हर्स्टपिनला 18 तर अँटोनेलीला 15 गुण मिळाले. या जेतेपदामुळे रसेलच्या जेतेपदाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

उष्णतेचा आणि बिघडलेल्या ड्रिंक्स सिस्टीमवर मात करीत रसेलने ही शर्यत जिंकली. स्प्रिंट शर्यती वगळता सुरुवातीच्या ऑस्ट्रेलियन ग्रां प्रि नंतरचे त्याचे हे पहिले जेतेपद आहे. शर्यत संपताना पहिल्या तीन स्पर्धकांमध्ये केवळ दोन सेकंदांचे अंतर होते. मॅक्लारेनच्या ऑस्कर पियास्ट्रीने चौथे, फेरारीच्या लेविस हॅमिल्टनने पाचवे, रेड बुलच्या इसाक हजदरने सहावे, मॅक्लारेनच्या लँडो नॉरिसने सातवे, फेरारीच्या चार्लस लेक्लर्कने आठवे, रेसिंग बुलच्या लियाम लॉसनने नववे व रेसिंग बुलच्याच अरविद लिंडब्लाडने शेवटचे दहावे स्थान मिळाले.

# न्यूझीलंडचा इंग्लंडवर ऐतिहासिक कसोटी मालिका विजय

■ नॉटिंगहॅम/वृत्तसंस्था




आयसीसी कसोटी चॅम्पियनशिप अंतर्गत येथे झालेली तीन सामन्यांची कसोटी मालिका न्यूझीलंडने हस्तगत केली. या मालिकेत न्यूझीलंडने यजमान इंग्लंडचा 2-1 अशा फरकाने पराभव केला. या मालिकेतील शेवटच्या सामन्यात न्यूझीलंडने इंग्लंडचा सोमवारी खेळाच्या शेवटच्या दिवशी 160 धावांनी दणदणीत पराभव केला. या सामन्यात न्यूझीलंड संघातील नाबाद शतक झळकविणारा आणि 5 झेल टिपणारा डॅरील मिचेलला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले तर इंग्लंडच्या जोफ्रा आर्चरला मालिकावीर म्हणून जाहीर करण्यात आले.

या शेवटच्या कसोटीत न्यूझीलंडने पहिल्या डावात 438 धावा जमविल्यानंतर इंग्लंडने पहिल्या डावात 354 धावा केल्या. न्यूझीलंडने इंग्लंडवर पहिल्या डावात 84 धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळविली. त्यानंतर न्यूझीलंडने दुसऱ्या डावात 94 षटकांत 9 बाद 288 धावांवर डाव घोषित करून इंग्लंडला निर्णायक विजयासाठी 373 धावांचे आव्हान दिले होते. न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावात डॅरील मिचेलने 241 चेंडूत 1 षटकार आणि 10 चौकारांसह नाबाद 100 तर रचिन रवींद्रने 149 चेंडूत 12 चौकारांसह 94 धावा झळकविल्या. या जोडीने चौथ्या गड्यासाठी 129 धावांची शतकी भागिदारी केली. इंग्लंडतर्फे आर्चरने 53 धावांत 4 तर स्टोक्स आणि ॲटकिन्सन यांनी प्रत्येकी 2 गडी तसेच शोएब बशिरने 1 गडी बाद केला.

इंग्लंडने 4 बाद 103 या धावसंख्येवरुन पाचव्या आणि शेवटच्या दिवशीच्या खेळाला पुढे प्रारंभ केला आणि त्यांचा दुसरा डाव 51.2 षटकांत 212 धावांत आटोपला. इंग्लंडच्या दुसऱ्या डावात जेमी स्मिथने 1 षटकार आणि 8 चौकारांसह 60 धावा तर डकेटने 6 चौकारांसह 36, कर्णधार स्टोक्सने 2 षटकार आणि 2 चौकारांसह 30, ब्रुकने 1 षटकार आणि 3 चौकारांसह 21, ॲटकिन्सनने 2 चौकारांसह 19 धावा आणि डकेटने 42 चेंडूत 6 चौकारांसह 36 धावा झळकविल्या. न्यूझीलंडतर्फे फॉक्सने 52 धावांत 3 तर नाथन स्मिथ आणि मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी 2 तसेच सियर्सने 1 गडी बाद केला. उपाहारानंतर काही मिनिटांतच इंग्लंडचा दुसरा डाव संपुष्टात आला. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सचा हा शेवटचा सामना होता. या सामन्यावेळी स्टोक्सने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून नाट्यमयरित्या निवृत्तीची घोषणा केली.

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने रविवारी न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटीतील खेळाच्या चौथ्या दिवशी नाट्यमयरित्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून आपल्या निवृत्तीची घोषणा करुन चाहत्यांना अनपेक्षित धक्का दिला. स्टोक्सने गेल्या 15 वर्षांच्या कालावधीत इंग्लंडचे प्रतिनिधीत्व करताना सातत्याने दर्जेदार कामगिरी केली आहे.

2019 साली लॉईस मैदानावर झालेल्या आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात इंग्लंडने न्यूझीलंडचा पराभव करुन पहिल्यांदा अजिंक्यपद मिळविले होते. या सामन्यात स्टोक्सची खेळी निर्णायक ठरली होती. तसेच 2022 साली इंग्लंडने आयसीसी टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धा जिंकली होती आणि इंग्लंड संघातर्फे स्टोक्सची खेळी महत्त्वाची ठरली होती. 2022 साली स्टोक्सची इंग्लंड कसोटी संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली होती. इंग्ल-वेल्स क्रिकेट मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्टोक्सच्या क्रिकेटमधील योगदानाचे कौतुक केले आहे.

# राम कपूर आहे महाराष्ट्राचा जावई! घटस्फोटित मराठी अभिनेत्रीवर जीव जडला अन्...

राम कपूर सध्या 'लॉक अप २' या शोमुळे चर्चेत आहे. या शोमध्ये त्याची वादग्रस्त वक्तव्ये सर्वांचं लक्ष वेधून घेत आहेत. रामने साक्षी तंवरबरोबरच्या किसिंग सीनबद्दल पत्नी गौतमीची प्रतिक्रिया काय होती तेही सांगितलं. यानंतर रामची पत्नी गौतमी कोण? याबद्दल चाहत्यांना जाणून घ्यायचंय. तर, रामची पत्नी गौतमी कपूर ही मराठी आहे. होय, राम कपूर महाराष्ट्राचा जावई असून त्याने घटस्फोटित असलेल्या गौतमी गाडगीळशी २३ वर्षांपूर्वी लग्न केलं होतं.

गौतमीचं माहेरचं नाव गौतमी गाडगीळ. तिचा जन्म २१ जून १९७४ रोजी झाला. तिने मॉडेलिंगपासून आपल्या करिअरची सुरुवात केली होती. 'घर एक मंदिर', 'लिपस्टिक', 'क्युंकी सास भी कभी बहू थी' आणि 'परवरिश' यांसारख्या प्रसिद्ध हिंदी मालिकांमध्ये तिने महत्त्वाच्या भूमिका साकारल्या. तसेच तिने काही मराठी व हिंदी चित्रपटांमध्येही काम केलं आहे.





राम कपूरशी लग्न करण्यापूर्वी गौतमीचं एक लग्न झालं होतं. तिचं पहिलं लग्न मधुर श्रॉफ यांच्याशी झाले होते. मॉडेलिंग करत असतानाच्या काळात त्यांची भेट झाली होती. मात्र, काही वैयक्तिक कारणांमुळे आणि मतभेदांमुळे हे नातं फार काळ टिकू शकलं नाही. लग्नानंतर काही काळातच त्यांचा घटस्फोट झाला. पहिल्या लग्नाबद्दल गौतमी किंवा मधुर यांनी कधीही जाहीरपणे फारशी चर्चा केली नाही. गौतमीच्या आयुष्यात राम कपूरची एन्ट्री २००० मध्ये झाली. त्या काळात 'सोनी टीव्ही'वर 'घर एक मंदिर' ही मालिका प्रचंड गाजत होती. या मालिकेत राम कपूर (राहुल) आणि गौतमी गाडगीळ (आंचल) यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. मालिकेच्या सेटवरच त्यांची पहिली भेट झाली. सुरवातीला ते फक्त सहकलाकार म्हणून एकत्र काम करत होते. राम कपूरचा स्वभाव अत्यंत मनमोकळा होता, तर गौतमी स्वभावाने खूप शांत आणि समजूतदार होती. या परस्परविरोधी स्वभावांमुळेच हळूहळू त्यांच्यात चांगली मैत्री झाली आणि मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले.

राम आणि गौतमी एकमेकांच्या प्रेमात पडले असले, तरी त्यांच्या लग्नाला विरोध झाला होता. राम कपूरच्या घरच्यांना गौतमीचं आधी लग्न झालं असल्याने आक्षेप होता. तर दुसरीकडे, गौतमीच्या घरच्यांना राम कपूरच्या बिंधास्त स्वभावामुळे काळजी वाटत होती. मात्र राम आणि गौतमी आपापल्या निर्णयावर ठाम होते. रामने एका मुलाखतीत सांगितलं होतं की, गौतमी त्याच्या आयुष्यात आल्यानंतर त्याच्यात खूप सकारात्मक बदल झाले आणि तो तिला गमावू इच्छित नव्हता. त्यामुळे त्यांनी कुटुंबीयांची मनधरणी केली.

शेवटी राम कपूर व गौतमी यांनी १४ फेब्रुवारी २००३ रोजी म्हणजेच व्हॅलेंटाईन डे रोजी अत्यंत साध्या पद्धतीने लग्न केलं. त्यांच्या लग्नाला आता २३ वर्षे झाली आहेत. त्यांना सिया आणि अक्स ही दोन अपत्ये आहेत.

## गुंडांना अभिनेत्रीनं शिकवलेला धडा

दक्षिणात्य अभिनेत्री कयादू लोहारनं मोजक्याच काही सिनेमांमध्ये काम करून प्रसिद्धी मिळवली. अभिनेत्रीनं केवळ आठ सिनेमांमध्ये काम केलं असलं तरी ती एक स्टार म्हणून ओळखली जाते. अशातच आता एका मुलाखतीमध्ये अभिनेत्रीनं तिच्या जुन्या आठवणी शेअर केल्या आहेत. कयादू शाळेत शिकत असताना तिनं रस्त्यावर त्रास देणाऱ्यांना चांगलंच धडा शिकवला होता. याबद्दलही अभिनेत्रीनं सांगितलं आहे.

'गलाट्टा तामिळ'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये कयादू म्हणाली की, 'मी शाळेत असताना माझ्या घराशेजारी दहावीच्या ट्यूशनला जायचे. रस्त्यावर काही मुलं मला पाहून इशारे करून छेड काढायचे. पहिल्या दिवशी मी विचार केला, ठीक आहे, जाऊदे. दुसऱ्या दिवशीही मी तसंच दुर्लक्ष केलं. पण तिसऱ्या दिवशी मात्र राग अनावर झाला. मला ते अजिबात सहन झालं नाही आणि माझा संयम सुटला.' 'मला प्रचंड राग आला. मी तिथला एक दगड उचलला आणि त्यांना फेकून मारला. त्यापैकी एकाला तो दगड लागला आणि त्याचं डोकं फुटलं. त्याच्या डोक्यातून रक्त येऊ लागलं आणि मी तिथून निघून गेले. त्यानंतर पुढे काय झालं मला माहित नाही, पण, ते गुंड होते. मला नाही वाटत की, तुम्ही सहज दगड उचलून कोणाचं डोकं फोडू शकता. पण त्या वेळी मला जे योग्य वाटलं, तेच मी केलं. मी दिसायला कदाचित शांत वाटत असेल, पण जेव्हा कोणी चुकीचं वागतं, तेव्हा मी अजिबात शांत राहत नाही, जशास तसं उत्तर दिलंच पाहिजे, असं मला वाटतं.' असं कयादूनं पुढे सांगितलं. दरम्यान, कयादू लोहारच्या कामाबद्दल सांगायचं तर ती 'हृदयन मुरली' आणि 'इमॉर्टल' या सिनेमांमध्ये दिसणार असून 'हृदयन मुरली' हा सिनेमा १० जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे. तसेच 'इमॉर्टल' हा सिनेमा २३ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे. इतकंच नव्हे तर अभिनेत्री सलमानच्या 'आय अॅम गेम', पृथ्वीराज सुकुमारनच्या 'खलिफा' या सिनेमांमध्येही झळकणार आहे.

## १५ वर्षांच्या दुःखी वैवाहिक आयुष्यापेक्षा 5 वर्ष लिव्ह-इनमध्ये राहिलेलं चांगलं; नव्या पिढीला झीनत अमान यांचा सल्ला

ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेत्री झीनत अमान त्यांच्या वक्तव्यांमुळे कायमच चर्चेत असतात. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये झीनत यांनी लिव्ह-इन रिलेशनशिपबद्दल भाष्य केलं आहे. 'पंधरा वर्षांच्या दुःखी वैवाहिक जीवनापेक्षा पाच वर्षे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणं चांगलं' असं झीनत यांनी म्हटलं आहे. झीनत यांनी आजच्या काळातील जोडप्यांना लग्नाच्या कायदेशीर नात्याबद्दल आणि त्यासोबत येणाऱ्या आयुष्यभराच्या कमीटमेंटबद्दल सल्ला दिला. जोडप्यांनी लग्नाआधी एकत्र वेळ घालवला पाहिजे, असं झीनत यांचं म्हणणं आहे.



१९७८ मध्ये झीनत अमान यांनी विवाहित असलेले आणि चार मुलं असलेले अभिनेते संजय खान यांच्यासोबत लग्न केलं. संजय खान यांच्यावर मारहाण आणि शारीरिक हिंसाचाराचा आरोप केल्यानंतर झीनत यांनी १९७९ मध्ये घटस्फोट घेतला. त्यानंतर झीनत यांनी १९८५ मध्ये अभिनेता मझहर खान यांच्यासोबत लग्न केलं.

शुभ्रा अय्यप्पाला दिलेल्या मुलाखतीमध्ये झीनत अमान म्हणाल्या की, 'आजच्या काळात कोणतीही गोष्ट कायमस्वरूपी टिकत नाही. पूर्वीही अशीच परिस्थिती होती, त्यामुळे लग्नाचं नातं आयुष्यभरासाठी स्वीकारण्यापूर्वी एकमेकांसह किती गोष्टी जुळतात हे तपासून पाहणं गरजेचं आहे असं मला वाटतं. लोकांना वाटतं की, रोमॅन्स हा कायम राहतो, पण तसं नसतं. कोणतीही गोष्ट कायमस्वरूपी राहत नाही. नात्यांवर नेहमी काम करावं लागतं आणि ते टिकवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.' 'जर नातं टिकायचं असेल तर त्यात जुळवून घ्यावं लागतं आणि तडजोड करावी लागते, तरच नातं टिकून राहतं आणि प्रेम वाढत जातं. पण, जर तुम्हाला वाटत असेल की, नात्यामध्ये हनिमून फेज कायम टिकून राहील तर तसं होत नाही.' असं झीनत यांनी सांगितलं.

झीनत अमान यांनी अलीकडेच एका सोशल मीडिया पोस्टद्वारे लिव्ह-इन रिलेशनशिपबद्दल आपलं मत व्यक्त केलेलं. 'माझ्या मागच्या पोस्टच्या कमेंट सेक्शनमध्ये तुमच्यापैकी एकानं मला रिलेशनशिपबद्दल सल्ला विचारला होता. हे माझं एक वैयक्तिक मत आहे जे मी यापूर्वी कधीही मांडलेलं नाही. जर तुम्ही रिलेशनशिपमध्ये असाल, तर लग्न करण्यापूर्वी एकत्र राहण्याचा सल्ला मी देईन. मी माझ्या मुलांनाही नेहमी हाच सल्ला दिला आहे. दोन व्यक्तींनी आपल्या कुटुंबांना सामील करण्यापूर्वी आपल्या नात्याची पडताळणी केली पाहिजे, असं मला वाटतं.' असं झीनत अमान यांनी सांगितलेलं.

## 'प्रेमाची गोष्ट' फेम अभिनेत्री आई होणार! लग्नानंतर २ वर्षांनी दिली गुडन्यूज

प्रेमाची गोष्ट, 'माझे मन तुझे झाले', 'स्वराज्य सौदामिनी ताराराणी' या मालिकांमधून घराघरांत पोहोचलेली लोकप्रिय अभिनेत्री म्हणजेच स्वरदा ठिगळे. वैयक्तिक आयुष्यात स्वरदा मार्च २०२४ मध्ये विवाहबंधनात अडकली, अलीकडेच तिच्या लग्नाला दोन वर्षे पूर्ण झाली. अभिनेत्रीच्या नवऱ्याचं नाव आहे सिद्धार्थ राऊत. या जोडप्याने नुकतीच सोशल मीडियावर एक खास बातमी शेअर केली आहे. अभिनेत्री स्वरदा ठिगळे लवकरच आई होणार आहे. बेबी बंप फ्लॉन्ट करतानाचा खास व्हिडीओ शेअर करत अभिनेत्रीने ही गुडन्यूज सर्वांना दिली आहे.

स्वरदा व तिचा पती समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारत असल्याचं या व्हिडीओमध्ये सुरुवातीला पाहायला मिळत आहे. यानंतर अभिनेत्री बेबी बंप फ्लॉन्ट करत ती प्रेग्नंट असल्याची गुडन्यूज सर्वांना देते. स्वरदाने या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये 'Baby Coming Soon...' असं म्हटलं आहे.







स्वरदाने शेअर केलेल्या व्हिडीओवर मधुरा देशपांडे, समृद्धी केळकर, पूजा बिरारी, अपूर्वा नेमळेकर, राज हंचनाळे, ऋतुजा बागवे, तितीक्षा तावडे, दीपा परब, प्रियांका तेंडोलकर अशा असंख्य कलाकारांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. तसेच आयुष्यातील या नव्या प्रवासासाठी स्वरदाला सर्वांनी भरभरून शुभेच्छा सुद्धा दिल्या आहेत. स्वरदा ठिगळेच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर, २०१३ मध्ये प्रसारित होणाऱ्या 'माझे मन तुझे झाले' या मालिकेमुळे ती प्रसिद्धीझोतात आली. २०१७ मध्ये तिने हिंदी मालिकेत काम केलं होतं. याशिवाय 'स्वराज्य सौदामिनी ताराराणी' या मालिकेत स्वरदा प्रमुख भूमिकेत झळकली होती. 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेमुळे सुद्धा स्वरदाला तुफान लोकप्रियता मिळाली.

'प्रेमाची गोष्ट' या मालिकेने छोट्या पडद्यावर जवळपास दोन वर्षे अधिराज्य गाजवलं. सुरुवातीला या मालिकेत प्रसिद्ध अभिनेत्री तेजश्री प्रधान मुख्य भूमिकेत झळकली होती. मात्र, तेजश्रीने ही मालिका सोडल्यावर मुक्ताच्या भूमिकेसाठी स्वरदाची वर्णी लागली. स्वरदाला सुद्धा प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळालं. जुलै २०२५ मध्ये या मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला होता.

'प्रेमाची गोष्ट' मालिका संपल्यावर स्वरदा कलाविश्वात फारशी सक्रिय नव्हती. आता अभिनेत्रीने गरोदर असल्याची खास बातमी शेअर करत सर्व चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी आधार व ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य

बुलढाणा/बुलढाणा

राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार असून, योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार क्रमांक व ॲग्रीस्टॅक आयडीची नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी ही माहिती तात्काळ संबंधित बँक शाखेकडे सादर करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

शासनाच्या २ जून २०२६ रोजीच्या निर्णयानुसार, सेवा सहकारी संस्था (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक), राष्ट्रीयकृत, ग्रामीण व खासगी बँकांकडून १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्ज, पुनर्गठित किंवा फेरपुनर्गठित कर्जाच्या थकबाकीवर ही योजना लागू होणार आहे. योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना मुद्दल व व्याजासह जास्तीत जास्त २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त रक्कम शेतकऱ्यांनी प्रथम भरावी लागेल. त्यानंतर एकवेळ समझोता योजनेअंतर्गत २ लाख रुपयांपर्यंतचा लाभ देण्यात येईल. यापूर्वी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना सर्व कर्ज खात्यांतील एकत्रित थकबाकीवर ५० हजार रुपयांपर्यंत लाभ देण्यात येणार आहे. तसेच सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्ज घेऊन नियमानुसार वेळेत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. याशिवाय, सन २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची वेळेत परतफ ेड केलेली रक्कम ५० हजार रुपयेपेक्षा कमी असल्यास, प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा किमान ५ हजार रुपये इतका लाभ देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांचा आधार क्रमांक आणि ॲग्रीस्टॅक आयडी बँकेकडे उपलब्ध असणे आवश्यक असल्याने सर्व पात्र शेतकऱ्यांनी ही माहिती त्वरित आपल्या बँक शाखेत जमा करावी.

# चांडोळ येथे सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षण संपन्न; ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार

जनसंचलन/बुलढाणा

ग्रामीण भागातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण, सुलभ व सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, चांडोळ (ता. बुलढाणा) येथे आयोजित करण्यात आलेले सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा () प्रशिक्षण उत्साहात संपन्न झाले. द. २६ ते ३० जून २०२६ या कालावधीत झालेल्या या प्रशिक्षणाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील नागरिकांना प्रभावी व दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरणार असून प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी दुर्धर आजार, हृदयविकार, अपघात, सर्पदंश तसेच अन्य आपत्कालीन परिस्थितींमध्ये अधिक सक्षमपणे सेवा देऊ शकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माझे गाव आरोग्य संपन्न गाव कसं काय ?फ या अभियानांतर्गत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षणामध्ये समुदाय आरोग्य अधिकारी (), आशा स्वयंसेविका, आरोग्य सेवक व आरोग्य सेविका यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. प्रशिक्षणादरम्यान गरोदर माता व प्रसूती सेवा, नवजात बालकांचे आरोग्य, किशोरवयीन आरोग्य, कुटुंब कल्याण, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांचे नियंत्रण, मानसिक आरोग्य, ज्येष्ठ नागरिकांची काळजी, आपत्कालीन वैद्यकीय सेवा तसेच योग व आरोग्य संवर्धन अशा १३ विविध आरोग्य सेवांबाबत सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज चिंचोले यांनी प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून नागरिकांच्या दारापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. प्रशांत बुधवत यांनी प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांना प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सरपाते यांनी ड्ढआरोग्य सेवा हीच पूजा, रुग्ण हाच परमेश्वरफ्ष हा संदेश देत सेवाभावी वृत्तीने कार्य करण्याचे आवाहन केले. प्रशिक्षणासाठी डॉ. निलेश जाधव, डॉ. संतोष सांगळे, स्वाती शेंद्रे, सुवर्णा बेलसरे, सुनिता जवंजाळ, कविता खाडे आणि सुलोचना परहाड यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी आरोग्य सहाय्यक सुनील लोखंडे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र चांडोळ येथील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. नितीन कदम यांनी केले.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिन ६ जुलै रोजी

जनसंचलन/बुलढाणा

सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी, गाऱ्हाणी आणि प्रशासकीय अडचणींचे वेळेत निराकरण करण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सोमवार दि. ६ जुलै २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे जिल्हास्तरीय लोकशाही दिनफ आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्या मांडण्यासाठी या व्यासपीठाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. अर्जासाठी निकष : लोकशाही दिनात तक्रार सादर करताना नागरिकांनी विहित अर्ज केवळ शासनाने ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यातच असावा, तक्रार किंवा निवेदन केवळ वैयक्तिक स्वरूपाचे असावे. (सामूहिक स्वरूपाचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत), अर्जाच्या दोन प्रती, संबंधित लोकशाही दिनाच्या किमान १५ दिवस आधी सादर करणे आवश्यक राहिल. तालुका लोकशाही दिनानंतर एक महिन्याने जिल्हास्तरावर, तर जिल्हास्तरांनंतर २ महिन्यांनी विभागीय आणि




त्यानंतर २ महिन्यांनी मंत्रालयीन स्तरावर अर्ज करता येईल. हे अर्ज स्विकारले जाणार नाहीत : न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपिल्स, सेवा व आस्थापना विषयक बाबी, विहीत नमून्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे/देण्यात येणार आहे अशा प्रकरणांत पून्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तीक स्वरुपाची नसेल तर, वरील प्रमाणे जे अर्ज लोकशाही दिनाकरीता स्विकृत करता येऊ शकत नाहीत असे अर्ज सामान्य तक्रार या स्वरुपात संबंधित विभागांकडे आवश्यक कारवाईसाठी ८ दिवसांत पाठवून त्याची प्रत अर्जदारास दिली जाईल. व्हॉट्सॲ प चॅटबॉट सुविधा : नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. आता नागरिक आपल्या तक्रारी आणि अर्ज ९४२३१८४८०४ या व्हॉट्सॲप क्रमांकावर चॅटबॉटद्वारे देखील सादर करू शकतात. जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी या लोकशाही दिनाचा सकारात्मक लाभ घ्यावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी कळविले आहे.-

# खामगाव येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहाची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू

जनसंचलन-बुलढाणा




शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी खामगाव येथील आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू झाली आहे. वसतिगृहातील रिक्त जागांवर मागील वर्षाच्या गुणवत्तेनुसार पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. या प्रवेश प्रक्रियेत इयत्ता ८ वी, इयत्ता ११ वी, डिप्लोमा प्रथम वर्ष, पदवी प्रथम वर्ष, पदव्युत्तर पदवी प्रथम वर्ष तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेश घेणारे पात्र विद्यार्थी अर्ज करू शकतात. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी .... या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज अचूक व परिपूर्ण भरावा. त्यानंतर अर्जाची प्रिंट तसेच आवश्यक कागदपत्रांसह वसतिगृह कार्यालयात कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. अधिकाधिक पात्र आदिवासी विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेऊन विहित मुदतीत प्रवेशासाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, खामगाव गृहपाल यांनी केले आहे.

# प्लॉटचा सौदा, चालकाच्या हातात ४ लाख अन् मध्येच गेम! मालकाने फोन केला तर उत्तरं उडवा-उडवीची; जळगाव जामोद पोलिसांत अपहाराचा गुन्हा दाखल

**जनसंचलन/ जळगाव जामोद** सिनेमात जशी पैशांची बॅग घेऊन एखादा माणूस अचानक गायब होतो आणि मालकाचे डोके फिरते, तसाच काहीसा प्रकार जळगाव जामोद परिसरात उघडकीस आला आहे. प्लॉटच्या व्यवहारातील उर्वरित रक्कम चालकाच्या हाती देण्यात आली; मात्र ती रक्कम मालकापर्यंत पोहोचलीच नाही. या प्रकरणी ४ लाख रुपयांच्या अपहाराचा गुन्हा जळगाव जामोद पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मलकापूर येथील हकीमी व्हीला, बीजीटीआय रोड परिसरातील अबीजर शब्बीर हुसेन शाकीर हे बिल्डिंग मटेरियल विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांनी १५ जून २०२६ रोजी मलकापूर येथील आपला प्लॉट वरवट बकाल येथील अनिल भावराव बकाल यांना ७ लाख ४५ हजार रुपयांत विकण्याचा सौदा केला होता. या व्यवहारात ४५ हजार रुपये रोख मिळाले होते, तर उर्वरित रक्कम २७ जून रोजी देण्याचे ठरले होते. दरम्यान, शाकीर यांच्या लोखंडी मालाची आयशर गाडी क्रमांक /२०//६६४० ही चालक देवेंद्र केशव वानखडे वरवट बकाल येथे घेऊन गेला होता. त्याचवेळी प्लॉट व्यवहारातील उर्वरित रकमेतून ४ लाख रुपये निळकंठ नागोराव बोरडे यांनी चालक देवेंद्र वानखडे यांच्या ताब्यात दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. यानंतर चालक रिकामी गाडी घेऊन मलकापूरकडे निघाला. मात्र दुपारी साडेएकच्या सुमारास मालक अबीजर शाकीर यांनी चालकाला फोन करून पैशांबाबत विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. रक्कम कुठे आहे, याबाबत स्पष्ट माहिती देण्याऐवजी तो टाळाटाळ करू लागला. पुढे तो खांडवीजवळ असल्याचे सांगितल्याने शाकीर स्वतः तेथे गेले. मात्र त्या ठिकाणी चालकाने आपल्याकडे कोणतीही रक्कम नसल्याचे सांगितले. विश्वासाने ताब्यात दिलेल्या ४ लाख रुपयांचा चालक देवेंद्र वानखडे याने अपहार करून आर्थिक नुकसान केल्याचा आरोप अबीजर शाकीर यांनी केला आहे. त्यांच्या तक्रारीवरून जळगाव जामोद पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या




कलम ३१६(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची एफआयआर क्रमांक ०४२४/२०२६ असून, एफआयआर ३० जून २०२६ रोजी रात्री ९ वाजून ४४ मिनिटांनी नोंदविण्यात आली आहे. प्लॉट व्यवहारातील रक्कम चालकाच्या हाती देण्यात आली आणि ती मालकापर्यंत पोहोचलीच नाही, या प्रकारामुळे परिसरातील व्यापारी वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे. पुढील तपास जळगाव जामोद पोलीस करीत आहेत.



# बुलढाण्यात गुन्हेगारांचा गेम ओव्हर? १९ कोटींच्या कारवायांनी तांबे पॅटर्नची जिल्हाभर दहशत!

## गांजा, रेती, गुटखा ते सायबर फ्रॉड तांबे यांच्या रडारवर आले अन् गुन्हेगारांची झोप उडाली; तांबे पॅटर्नने अवैध धंद्यांना चाप!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात २०२६ हे वर्ष गुन्हेगारांसाठी धडकी भरवणारे आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी विश्वास वाढवणारे ठरले आहे. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या दमदार नेतृत्वाखाली बुलढाणा जिल्हा पोलीस दलाने गुन्हे उकल, अमली पदार्थविरोधी मोहीम, अवैध रेती तस्करी, गुटखा, सायबर गुन्हे आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या आघाडीवर विक्रमी कामगिरी करत जिल्ह्यात ङ्गतांबे पॅटर्नफ्ची जोरदार छाप उमटवली आहे. वर्षभरात विविध कारवायांमधून पोलिसांनी तब्बल १९ कोटी १९ लाख १५ हजार ६०७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. खून, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये ७९ टक्के गुन्हे उकलण्यात पोलिसांना यश आले असून ४ कोटी ७ लाख ६१ हजार ३२९ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कामगिरी केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून गुन्हेगारांच्या मनात कायद्याची भीती निर्माण करणारी ठरली आहे. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या मिशन परिवर्तनफ्ने अमली पदार्थांच्या जाळ्यावर जबरदस्त प्रहार केला. या मोहिमेत ५५ गुन्हे दाखल करून ५८ आरोपींना अटक करण्यात आली. ३२४.८४६ किलो गांजा व अफूसह जवळपास १ कोटी ९९ लाख ७८ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे, पोलिसांनी फक्त कारवाईच केली नाही, तर पथनाट्य, व्यसनमुक्ती अभियान आणि जनजागृतीच्या माध्यमातून तरुणाईला व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढण्याचाही प्रयत्न केला. अवैध रेती तस्करीविरोधातही बुलढाणा पोलिसांनी कडक भूमिका घेत ५३ गुन्हे दाखल केले. १०१ आरोपींना ताब्यात घेत ५ कोटी ७८ लाख २४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. प्रतिबंधित गुटख्याविरोधात १२ प्रकरणांत १४ आरोपींना अटक करून १ कोटी ८ लाख ३९ हजार १५० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. मद्यविषयक कायद्यांतर्गत १,९८१ गुन्ह्यांत २,०२८ आरोपींवर कारवाई झाली, तर जुगारविरोधी ८४२ कारवायांत १,२१५ आरोपींना चाप बसवण्यात आला. सायबर गुन्ह्यांमध्येही पोलिसांनी नागरिकांना मोठा दिलासा दिला. हरवलेले २१७ मोबाईल मूळ मालकांना परत देण्यात आले, तर सायबर फसवणुकीतील १७ लाख २८ हजार १३८ रुपये तक्रारदारांना परत मिळवून देण्यात यश आले. अपहरणाच्या ११० प्रकरणांपैकी ९१ व्यक्तींची सुटका, तर हरविलेल्या ७१८ व्यक्तींपैकी ५१२ जणांचा शोध लावण्यात आला. वाहतूक नियमभंगाविरोधात ५५ हजार ९२९ प्रकरणांमध्ये कारवाई करून ४ कोटी १४ लाख ४६ हजार ४५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांवरही ११२ प्रकरणांत कारवाई झाली. कम्युनिटी पोलिसिंग, महिला-बालक सुरक्षा, डायल ११२, सायबर सुरक्षा, शाळा-महाविद्यालयांतील जनजागृती, वृक्षारोपण आणि रॅलींच्या माध्यमातून बुलढाणा पोलिसांनी जनतेशी थेट नाळ जोडली. त्यामुळे २०२६ मध्ये बुलढाणा पोलीस दलाने केवळ गुन्हेगारांना धडा शिकवला नाही, तर जनतेचा विश्वासही दुप्पट केला. निलेश तांबे यांच्या नेतृत्वाखालील ही कामगिरी जिल्हा पोलिसांच्या इतिहासातील एक दमदार अध्याय ठरत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८